महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/ कांदळवन/ पवार/३१९१३/२०१९ | 1364 | दिनांक : ०२/०७/२०१९.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

विषय :- **कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत .**
**Mangroves Destruction across Uran-३**
**(श्री.बी.एन.कुमार व श्री.नंदकुमार पवार)**

श्री.बी.एन.कुमार व श्री.नंदकुमार पवार यांनी दास्तान फाटा, जासई, ता.उरण, जि.रायगड येथे कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून सदर प्रकरणी खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे. सदर तक्रारीबाबत तहसिलदार उरण, मंडळ अधिकारी जासई, नियत क्षेत्र अधिकारी विंधणे, नियत क्षेत्र अधिकारी कांदळवन उरण, तलाठी सजा जासई यांचेसह तक्रारदार श्री.बी.एन.कुमार व श्री.नंदकुमार पवार यांचे समक्ष दि.२४/१२/२०१८ रोजी कांदळवनाचे ऱ्हासाबाबत स्थळपाहणी करण्यात आली आहे. सदर स्थळपाहणीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

सदर तक्रारी अर्जात नमुद केलेल्या सदरच्या जागेत दास्तान फाटा जेएनपीटी चे १२.५% चे प्लॉट तयार करण्याचे काम चालू आहे. तसेच दास्तान फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम चालू आहे. सदरची जागा वेटलॅन्ड नसून तेथे कांदळवनही आढळून आलेले नाही. अर्जदार यांनी तक्रारीत नमुद केलेले ठिकाण हे मौजे जासई, ता.उरण या महसूल गावातील क्षेत्र आहे. त्यानुसार MRSAC नागपूर यांचेकडील प्राप्त नकाशा तपासला असता सदरची जागा ही कांदळवन अथवा वेटलँड जागा नसल्याचे दिसून येत आहे. MRSAC नकाशानुसार जासई येथील सदर क्षेत्राची पडताळणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचे क्षेत्र दाखविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील दि.०२/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या अहवाला सोबतचा जबाब व पंचनामा पाहता, त्यामध्ये पाणथळ जागेत मातीचा भराव टाकण्याचे काम सुरु आहे. तसेच, पाणथळ जागेमध्ये शिवस्मारकाचे बांधकाम असून पाणथळ जमिनीचा ऱ्हास होत असल्याने स्मारकाचे व भरावाचे काम थांबवून पाणथळ जमिन वाचविण्यासंदर्भात नमूद केले आहे. उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला अहवाल व त्यासोबतचा जबाब व पंचनामा यामध्ये तफावत दिसून आल्याने या कार्यालयाकडील पत्र दि.७/०१/२०१९ अन्वये सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासन निण्रय क्र.एस-३०/२०१३/प्र.क्र.४७९/भाग-१/फ-३,दि.०२/०९/२०१६ मध्ये दिलेल्या सुचनानुसार कार्यवाही करुन पूर्तता अहवाल तातडीने सादर करण्याबाबत कळविण्यांत आलेले होते.

त्याअनुषंगाने, उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी त्यांचेकडील पत्र दि.२७/०६/२०१९ अन्वये कळविलेनुसार सदर प्रकरणी सन २००५ व सन २०१९ लगतच्या मागील ३ वर्षातील गुगल इमेजची तपासणी केली असता सदर ठिकाण हे पाणथळ नसल्याचे दिसून येत असून सदर ठिकाणी यापूर्वी कांदळवन नव्हते. त्यामुळे सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. त्यामुळे सदर तक्रारी अर्ज प्रलंबित यादीतून वगळणेबाबत उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी विनंती केली आहे. सदर प्रकरणी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे सदर जागा ही कांदळवन व पाणथळ नसल्याने अर्जदार यांची तक्रार निकाली काढण्यांत यावी असे वाटते.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांचेकडील अहवालान्वये, वरील प्रमाणे वस्तूस्थिती निदर्शनास आलेली आहे. तरी वरील प्रमाणे वस्तुस्थिती अर्जदार यांना कळविण्यात यावी, ही विनंती. सोबत उपविभागीय अधिकारी पनवेल यांच्याकडील अहवालाची व त्यासोबतच्या स्थळपाहणी अहवालाची, सन २००५ ची गुगल ईमेज, सन २०१९ व लगतच्या तीन वर्षाच्या गुगल ईमेजच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.**

**जिल्हाधिकारी रायगड करिता**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**
**हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१**
❖ दु.क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

**क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/ कांदळवन/२०१८** **दिनांक : २५/१२/२०१८**

प्रति,

उपविभागीय अधिकारी पनवेल

विषय:- Mangroves Destruction across Uran-३

संदर्भ:- आपलेकडील पत्र क्र.उविअ/जमिनबाब/कात-१/कांदळवन/२०१८
दि.१९/१२/२०१८

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये व श्री.एन बी. कुमार व श्री.नंदकुमार पवार रा. उरण यांनी उरण येथील कांदळवन तोडी संदर्भात केलेल्या तक्रारी बाबत अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता, सदर ठिकाणी शिवस्मारकाचे काम सुरु असुन त्या ठिकाणी कांदळवन नसल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर ठिकाणी यापूर्वी कांदळवन होते अगर कसे या बाबत सन २००५च्या गुगल इमेजेस तपासुन खात्री केल्याचे दिसुन येत नाही.

तरी प्रकरणी सन २००५ च्या गुगल इमेजेस तपासुन तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार जागेवर कांदळवनाची तोड झाली आहे अगर कसे याबाबत खात्री करावी. व त्याप्रमाणे स्पष्ट अभिप्रायासह फेरअहवाल सादर करावा.

(विशाल दौंडकर)
तहसिलदार (महसुल)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड

जावक
तारीख - २६/१२/१८
सही -
लेखनिक

(१९)

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल**

दुरध्वनी/फॅक्स क्र: ०२२-२७४५२३२८ Email- **sdo_panvel@yahoo.com**

जा.क्र.जमिनबाब/कात-१/कांदळवन/ ७१३१ /२०१८ दिनांक :- ०२/०१/२०१९

**प्रति,**

मा. जिल्हाधिकारी रायगड,
अलिबाग (महसूल शाखा)

**विषय: -** Mangroves Destruction across Uran-३.

**संदर्भ: -** १.आपलेकडील पत्र मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/ई-मेल-तक्रार/पवार/३/२०१८, दि. १२/१२/२०१८.

२. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र. जमिनबाब/कात-१/कांदळवन तक्रार/ कुमार/ पवार/२०१८, दिनांक /१२/२०१८

उपरोक्त विषयीचे कामी सादर करणेत येते की, श्री.बी. एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार यांनी मौजे दास्तान नोड, ता.उरण या ठिकाणी रस्ता अडविण्यात आला असून खाडीच्या पाण्याचा मुख्य प्रवाह बंद केल्याबाबत तसेच कांदळवन व पाणथळ जागेचा ऱ्हास होत असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या दि. ०१/११/२०१८ च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत अर्जात नमुद केले आहे. सदर तक्रारीबाबत तहसिलदार उरण, मंडळ अधिकारी उरण, नियत क्षेत्र अधिकारी विंधणे, नियत क्षेत्र अधिकारी कांदळवन उरण, तलाठी सजा जासई यांचेसह श्री.बी.एन.कुमार व नंदकुमार पवार यांचे समक्ष दिनांक २४/१२/२०१८ रोजी कांदळवनाचे ऱ्हासाबाबत स्थळ पाहणी करण्यात आली आहे. सदर स्थळ पाहणीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सदर तक्रारी अर्जात नमुद केलेल्या सदरच्या जागेत दास्तान फाटा जेएनपीटी चे १२.५% चे प्लॉट तयार करण्याचे काम चालु आहे. तसेच दास्तान फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम चालु आहे. सदरची जागा वेटलॅन्ड नसुन तेथे कांदळवनही आढळुन आलेले नाही. अर्जदार यांनी तक्रारीत नमूद केलेले ठिकाण हे मौजे जासई, ता उरण या महसूल गावातील क्षेत्र आहे. त्यानुसार MRSAC नागपूर यांचेकडील प्राप्त नकाशा तपासला असता सदरची जागा ही कांदळवन अथवा वेटलँड जागा नसल्याचे दिसून येत आहे. MRSAC नकाशानुसार जासई येथील सदर क्षेत्राची पडताळणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचे क्षेत्र दाखविण्यात आल्याचे दिसून येत नाही. सबब अर्जदार यांची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
महसूल शाखा
७१९
03 JAN 2019
मशा/अ-३

Rawale
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

(२)

क्र मंअउरण/कावि-४८४/जासई / २०१८
मंडळ अधिकारी उरण यांचे
कार्यालय उरण, ता. उरण.
दि २४/१२/२०१८

मा. तहसिलदार सो
यांजकडे सविनय सादर

विषय :- **Mangroves Destrusction across Uran-२ & Uran -३**

संदर्भ :- . आपलेकडील पत्र क्र मशा जमिन्बाब/कात-१/ कांदळवन /तक्रार/२०१८, दि १७/१२/२०१८.

उपरोक्त विषयाकामी सादर करणेत येतेकी, श्री बी. एन. कुमार व श्री नंदकुमार पवार यांनी मा. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांजकडे दास्तान फाटा- जासई, ता. उरण, जिल्हा रायगड येथील पाणथळ जमिनीवर मातीचा भराव केल्यामुळे पाणथळ जमीनीच –हास झालेबाबत केलेल्या तक्रारी नुसार दि २४/१२/२०१८ रोजी अर्जदार यांचे समवेत स्थळ पाहणी केली आहे.

दास्तान फाटा- जासई, ता. उरण, जिल्हा रायगड येथे जे. एन.पी. टी. मार्फत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारकाचे बांधकाम सुरु आहे. तसेच तेथील जमिनीवर प्रकल्प ग्रस्ताना वाटप करण्याचे १२.५% प्लॉटचे कामासाठी मातीचा भाराव करणेचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. यापूर्वी सदर ठिकाणी शेती होती. तेथे पाणथळ जनीन नव्हती असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

सोबत जबाब, पंचनामा पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

(लक्ष्मण ध. ठाकुर )
मंडळ अधिकारी उरण.

Scanned by CamScanner

जबाब

मंडळ अधिकारी उरण, नियत क्षेत्र अधिकारी चिंधरो, नियत क्षेत्र अधिकारी कांदळवन उरण, तलाठी सजा जासई यांचे समक्ष श्री बी. एन कुमार व श्री नंदकुमार पवार यांनी मा. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांनी दास्तान फाटा जासई येथील सुमारे ४०० एकर पाणथळ जागा असून त्यामध्ये सद्यस्थितीत मातीचा भराव सुरु असून या आधी पाणथळ जागेपैकी सुमारे २०० एकर जागेवर मातीचा भराव झालेबाबत तक्रार दाखल केलेल्या अनुषंगाने जबाब लिहून देतो की सद्यस्थितीत पाणथळ जागेत मातीचा भराव टाकणेचे काम सुरु आहे तसेच पाणथळ जागेमध्ये शिवस्मारकाचे बांधकाम चालू आहे. तरी सदरचा मातीचे भराव त्वरीत थांबवावा

हा जबाब लिहून दिला असे.

जबाब वाचून दाखविला व तो बरोबर आहे

[signature] २४/१२/२०१८

ठिकाण - दास्तान फाटा जासई

दिनांक : - २४/१२/२०१८

श्री नंदकुमार वामन पवार

समक्ष

[signature]

प्र. मंडळ अधिकारी जासई

[signature]

तलाठी जासई

[signature]

व. नि. क्षेत्र

[signature]

व. र. [illegible]

[signature]

B N KUMAR

24/12/18

Scanned by CamScanner

(२५)

# पंचनामा

आम्ही खालील सह्या करणारे पंचलोक सर्व राहणार उरण, ता. उरण, जि. रायगड

मंडळ अधिकारी उरण, नियत क्षेत्र अधिकारी चिरनेर नियत क्षेत्र अधिकारी कोप्रोली उरण यांनी विचारलेवरुन समक्ष हजर राहून पंचनामा लिहून देतो की श्री. बी. एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार यांनी मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांनी दास्तान फाटा (जासई) येथील पाणथळ जमिनीवर मातीचा भराव केल्याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने पंचनामा लिहून देतो की.

दास्तान फाटा - जासई येथे जेएनपीटी मार्फत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारकाचे काम सुरु आहे. सदरच्या स्मारकाचे काम हे Progressive civil Construction Pvt. Ltd व Hauware Infrastructure Pvt. Limited यांचे मार्फत सुरु आहे. त्या ठिकाणी मातीचा भराव सुरु आहे. त्यामुळे तेथील पाणथळ जमिनीचा ऱ्हास होत आहे. तरी सदर ठिकाणचे स्मारकाचे काम व भरावाचे काम त्वरित थांबवून पाणथळ जमिन वाचविण्यासाठी हा पंचनामा लिहून दिला आहे. सदरचा पंचनामा वाचून पाहिला तो बरोबर आहे.

ठिकाण - दास्तानफाटा जासई
दि. २४/१२/२०१५

समक्ष
(सही)
प्र. मंडळ अधिकारी जासई
(सही)
मंडळ अधिकारी उरण,
ता. उरण, जि. रायगड

(१) न. क्षे. अ. जासई
२४/१२/२०१८

(सही)
(१) दिलीप पां. कोळी

(सही)
(२) विवेक रा. कोळी

(सही)
(३) तुकाराम ज. कोळी

(४) ____________

Scanned by CamScanner





Scanned by CamScanner

# MOUZE- JASHAI (PART), TALUKA- URAN, DISTRICT- RAIGAD

**PLATE- II/20**

## INDEX MAP



0 1.25 2.5 Km.


N

Scale 1 : 5000

0 0.1 0.2 Km

**Legend**

- Parcels
- New Mangrove Parcel
- Mangrove Sparse
- Mudflat
- Creek



**Source:** 1. Village Cadastral Maps from Land Record Department, GOM.
2. Quick Bird Satellite Data of 60 cm Resolution for the year 2006, 2008, 2009 and 2010

**Prepared For**
Mangrove Cell, Maharashtra Forest Department,
Mumbai - 400 051

MRSAC

**Prepared By**
Maharashtra Remote Sensing Applications Centre,
VNIT Campus, S.A. Road,
Nagpur - 440 010

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

# उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी, पनवेल, उप विभाग पनवेल

जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१० २०६,
कार्यालय दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२३२८, फॅक्स क्र.०२२-२७४६९१३४ ई-मेल : sdo_panvel@yahoo.com

| | |
|---|---|
| जा.क्र.जमिनबाब/कात-१/कांदळवन/पवार-३/ऽ२७-३/२०१९/ | दि. २७/०६/२०१९ |

प्रति,
प्रति,
मा. जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग (महसूल शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
मध्यवर्ती नोंदणी शाखा
आवक क्र : 31913
दिनांक : 28 JUN 2019
शाखेचे नांव : मशा/अ-3
मा.त.वि.निउजि/उजि (सा.) मा. जिल्हाधिकारी

**विषय:- Mangroves destruction across Uran-३**
**अर्जदार - श्री. बी. एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार,**


संदर्भ:- १. तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग यांचेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/ईमेल तक्रार/पवार/२/२०१८, दिनांक १२/१२/२०१८
२. तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग यांचेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/२०१८, दिनांक २४/१२/२०१९
३. तहसिलदार उरण यांचेकडील अहवाल दिनांक २७/०६/२०१९

उपरोक्त विषयीचे कामी सादर करणेत येते की, आपले कार्यालयाकडील संदर्भीय पत्र क्र.१ चे अनुषंगने तहसिलदार उरण यांचेमार्फत चौकशी करुन या कार्यालयाकडील पत्र दिनांक ०२/०१/२०१९ अन्वये अहवाल सादर करणेत आलेला आहे. मात्र सदर प्रकरणी गुगल इमेजची तपासणी करणेबाबत आपलेकडील संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये कळविणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार उरण यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २७/०६/२०१९ अन्वये गुगल इमेजची तपासणी करुन अहवाल सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी सन २००५ व सन २०१९ लगतच्या मागील ३ वर्षातील गुगन इमेजची तपासणी केली असता सदर ठिकाण हे पाणथळ नसल्याचे दिसून येत असून सदर ठिकाणी यापुर्वी कांदळवन नव्हते त्यामुळे सदर ठिकाणी कांदळवनाचा -हास झालेला नाही. तरी सदरचे प्रकरण आपलेकडील प्रलंबित यादीमधून वगळणेस विनंती आहे.

(स्थळप्रत मा. उ.वि.अ. यांचे सहिची असे)

नायब तहसिलदार
उपविभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल कार्या




Google Earth
File Edit View Tools Add Help
dastan phata
Sign in
1/21/2013
Image © 2019 DigitalGlobe
Google Earth
2002
Imagery Date: 1/21/2013 18°55'31.29" N 73°00'59.78" E elev 0 ft eye alt 1110 ft
start
Google Earth
Presentation1
Presentation2


यु.मं.ग्रा.गावडे

(ड)


Google Earth
File Edit View Tools Add Help
dastan phata
Sign In
1/28/2014
Image © 2019 DigitalGlobe
Google Earth
2002
Imagery Date: 1/28/2014 18°55'33.25" N 73°01'03.05" E elev 0 ft eye alt 1110 ft
start
Letter - Microsoft ...
Google Earth
Local Disk (D:)

प्र.मं.३१.७७१६



Google Earth
File Edit View Tools Add Help
dastan phata
Sign in
11/23/2012
Image © 2019 DigitalGlobe
Google Earth
2002
Imagery Date: 11/23/2012 18°55'31.39" N 73°01'05.44" E elev 0 ft eye alt 1110 ft
start
Google Earth
Local Disk (D:)
8:05 PM


Google Earth
File Edit View Tools Add Help
dastan phata
Sign In
s Station
2002
© 2018 Google
Image © 2019 Maxar Technologies
Google Earth
Imagery Date: 2/12/2019 18°55'30.59" N 73°01'03.57" E elev 0 ft eye alt 1469 ft
start
Google Earth
Local Disk (D:)
8:11 PM